# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक
## 2023-24

क्र.साप्रवि/एफजीआर/13 दि.11.10.2023

विषय : दि.30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या कर्मचा-यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत.

संदर्भ : 1) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.वेतन-2023/प्र.क्र.13/सेवा-3 दि.28.06.2023

2) मान.महानगरपालिका आयुक्त यांचे क्र.एमजीसी/एफ/935 दि.10.10.2023 रोजीचे आदेश.

राज्य शासनाने शासन परिपत्रक क्र.वेतन-2023/प्र.क्र.13/सेवा-3 दि.28.06.2023 अन्वये दि.30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या कर्मचा-यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत

2. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक 1881/2023 व इतर याचिकांमध्ये दि.16.02.2023 रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत-

"We, therefore, find it appropriate to order as under:-

[a] We direct the Chief Secretary of the State of Maharashtra and Principal Secretary (Finance Department), State of Maharashtra, to issue appropriate directions to all the concerned departments to appeal to such candidates, who fall in such category having retired on 30th June of the particular years and who have earned the annual increment on account of performing work for 12 months ending on 30th June, to tender their applications to the concerned Authorities.

[b] After such applications are received, the concerned authorities would grant the reliefs as are being granted by the various High Courts by restricting the arrears of payments to 3 years preceding the dates of the applications or preceding the date of actual retirement as per actuals, whichever is less. With these guidelines, the

concerned authorities shall not reject a single application if it fits into the parameters of the judgments delivered by this Court.

[c] In the alternative, let the concerned authorities suo-moto dig out such cases and after scrutinizing the same as regards their entitlment, proceed to grant the benefits as per the judgments of this court, within 120 days.

[d] While undertaking the above exercise, the gratuity/pay fixation/ Pension will be re-calculated, so as to be paid to the candidates with arrears as directed above. "

3. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सेवा विषयक नियम, निवृत्तीवेतन नियम, वेतन सुधारणा, विविध भत्ते इ. सर्वसाधारणपणे राज्य शासनाच्या नागरी सेवा नियमांवर आधारीत असून त्यामध्ये वेळोवेळी राज्य शासनाच्या धर्तीवर सुधारणा करण्यात येतात. दि.30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या कर्मचा-यांना लगतच्या 1 जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तीवेतन निश्चित करण्याबाबत राज्य शासनाच्या उपरोक्त शासन निर्णयाच्या धर्तीवर पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

"मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेले उपरोक्त आदेश विचारात घेऊन सर्व विभागांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

जे महानगरपालिका कर्मचारी दि.30 जून रोजी सेवानिवृत्त झाले आहेत व मागील 12 महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे अशा सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दि. 01 जुलै रोजीची काल्पनिक (Notional) वेतनावाढ विचारात घेऊन, त्यांचे सेवानिवृत्तीवेतन सुधारीत करण्यासाठी संबंधित कार्यालयांकडे अर्ज करण्याबाबत सर्व संबंधित सेवानिवृत्तीवेतनधारकांना / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना आवाहन करण्याबाबत, सर्व खाते प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त आस्थापना विभागांना निर्देश देण्यात यावेत.

त्यानंतर याप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संबंधित कार्यालयांनी वर नमूद केलेल्या मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार संबंधितांना सुधारीत सेवानिवृत्तीविषयक लाभ अनुज्ञेय करावेत. तसेच सदर लाभ सुधारीत करण्यात आल्यानंतर त्यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकाच्या मागील 3 वर्षांची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक या पैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करीत असलेल्या कोणत्याही सेवानिवृत्ताचा अर्ज फेटाळण्यात येऊ नये.

तसेच संबंधित कार्यालयांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे अशा प्रकरणांचा त्यांच्या स्तरावरच तपासणी करुन निपटारा करावा."

4. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक 16.02.2023 रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक 9 मध्ये नमूद केले आहे की, This notional inclusion of the annual increment would be considered for re-calculating their pension, gratuity, earned leave, commutation of pension benefits etc. तरी त्याप्रमाणे अर्जदारास लाभ अनुज्ञेय करण्यात यावे.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या उपरोक्त निर्णयाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

5. सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी दिनांकानंतर दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/ होणा-या तसेच ज्यांनी मागील 12 महिन्याची अर्हताकारी सेवा पूर्ण केली आहे अशा महानगरपालिका कर्मचा-यांना दिनांक 01 जुलै ची काल्पनिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

सर्व खाते प्रमुख, अधिष्ठाता (रुग्णालये) व सहाय्यक आयुक्त यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील आस्थापना कर्मचा-यांना वरील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यास सुचित करावे.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या Intranet वर ftp://hr.mcgm.gov.in/ Circular/GAD/ Dy.C.A. (Estt.)/FGR या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/- दि.14.08.2023
श्रीम.वैशाली देसाई
उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)

सही/- दि.14.08.2023
श्रीम.सुलोचना कवडे
प्रमुख लेखापाल (कोषागार)

सही/- दि.15.08.2023
श्री.प्रदिप पडवळ
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

सही/- दि.04.09.2023
श्री.प्रशांत गायकवाड
मान.उप आयुक्त (वित्त)

सही/- दि.04.09.2023
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/- दि.27.09.2023
डॉ.अश्विनी जोशी
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- दि.27.09.2023
श्री. पी. वेलरासू
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)

सही/- दि.09.102023
डॉ. इ. सिं. चहल
मान.महानगरपालिका आयुक्त

# परिपत्रक

## 2023-24

क्र.साप्रवि/एफजीआर / 13 दि.11.10.2023

प्रत ---------------------------------------------- यांना (-------------- ज्यादा प्रतींसह) माहितीसाठी

आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.

11.10.2023

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) यांजकरिता